पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८
माहिती व तंत्रज्ञान विभाग
जा.क्र.मातंवि/१३/कावि/७७/१६
दिनांक -- ०९ /०[illegible]/२०१६

**विषय – महापालिका संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करणेबाबत..**
**संदर्भ – १) शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र.११२/नवि-२०**
**दिनांक १९/०३/२०१६**
**२) परिपत्रक क्र. मातंवि/१३/कावि/१६/२०१६ दिनांक १३/०१/२०१६**

**परिपत्रक,**

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये सर्व महानगरपालिका, नगरपालिका,नगरपंचायती यांनी त्यांचे अंदाजपत्रक, त्यांनी हाती घेतलेली कामे, घेतलेली कंत्राटे या विषयाबाबतची माहिती दिनांक ३१/०३/२०१६ पर्यंत संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत कळविले आहे.त्याची प्रत सोबत जोडणेत आलेली आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये विविध विभागांशी संबंधित माहिती (उदा.परिपत्रके, आदेश, निविदा, कोटेशन,विविध योजना तसेच नागरिकांना देण्यात येणा-या सेवा, RTI अंतर्गत प्रसिध्द करावयाची माहिती इ.) वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत कळविणेत आलेले असुन देखील अद्याप काही विभाग सदरची माहिती तसेच माहितीतील झालेले बदल संकेतस्थळावर प्रसिध्द करीत नसल्याचे दिसुन येत आहे.

तरी संदर्भ क्र.१ मधील शासन परिपत्रकामध्ये नमुद केलेली तसेच आपले विभागाशी संबंधित माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व ती वेळोवेळी अद्ययावत करणेबाबत दक्षता घेण्यात यावी. याबाबत यापुर्वीच सर्व संबंधित विभागांना त्यांची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व अद्ययावत करणेबाबतचे अधिकार (login ID व Password) देणेत आलेले आहेत. तरी उपरोक्त माहिती प्रसिध्द करणेबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झालेस माहिती व तंत्रज्ञान विभागाशी संपर्क साधावा.

विहित मुदतीत संबंधित माहिती मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध झाली नाही तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागप्रमुखांची राहील याची नोंद घेणेत यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती यांनी त्यांची संकेत स्थळे अद्ययावत ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक:- संकिर्ण-२०१६/प्र.क्र.११२/नवि-२०
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- १९ मार्च, २०१६.

वाचा:- मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र यांचे आदेश क्र.मुमाआ-२०१६/नों.क्र.५१७ /अपील क्र.५००/२०१६/०१, दि. ०१.०३.२०१६.

शासन परिपत्रक:-

श्री.प्रणव भारत पाटील, रा. ता.कागल, जि. कोल्हापूर यांनी राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल केलेल्या अपीलाच्या वेळी दि. ०१.०३.२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती यांनी त्यांचे अंदाजपत्रक, त्यांनी हाती घेतलेली कामे, घेतलेली कंत्राटे या विषयाबाबतची माहिती दि. ३१.०३.२०१६ पर्यंत त्यांच्या संकेत स्थळावर ठेवावी.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २०१६०३१९१२४७५००८२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Jayasingrao N Patil

( ज. ना. पाटील )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२) सर्व सन्माननीय विधानसभा/ विधानपरिषद व संसद सदस्य
३) मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव
४) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव
५) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय, राज्य माहिती आयोग, १३ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई.
७) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
८) मा. लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय
९) मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी
१०) राज्यातील सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
११) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
१२) मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती
१३) नगर विकास विभागातील सर्व कार्यासने
१४) श्री. प्रणव भारत पाटील, मातोश्री निवास महालक्ष्मीनगर मुरगूड, ता. कागल, जि. कोल्हापूर- ४१६२१९
१५) निवडनस्ती

प्रशासन विभाग
दिनांक:- 19 MAR 2016
आवक क्र:- 239
विभाग
लिपीक
मु. लिपीक
प्रशासन अधिकारी -
सहा. आयुक्त प्रशासन:-
अति. आयुक्त:-
आयुक्त:-